# अस्वस्थ वर्तमान आणि कलावंतांची भूमिका

गौतमीपुत्र कांबळे/सांगली/९८२२९७५४३०

'वर्तमानात जगा' (Live in Present) असं अनेक तत्त्वेत्यांनी पुन्हा पुन्हा सांगितलंय. भूतकाळाचं अनावश्यक ओझं वर्तमानावर लादल्यामुळे आणि भविष्याच्या अंधारात निरर्थक चाचपडण्यामुळं हातातील वर्तमान निसटून जाईल. असं त्यांचं म्हणणं असतं. तशी वर्तमान ही अवस्था सापेक्षच. त्यामुळं कोणत्याही वर्तमानाला त्याच्या बऱ्या वाईट भूतकाळाचं ओझं जसं टाकून देता येत नाही तसेच भविष्याच्या अगदी गडद काळोखात डोकावणाऱ्या वर्तमानाला कोणी रोखूही शकत नाही.

प्रत्येक वर्तमान कमी-जास्त प्रमाणात अस्वस्थ करणारा असतोच. ज्यांचं अस्तित्व असुरक्षित आणि धोक्यात येतं अशा व्यक्ती आणि समूहही अस्वस्थ असतात. विवेकी आणि संवेदनशील व्यक्ती तर कायमच अस्वस्थ असतात. त्यांची ही अस्वस्थता कोणत्याही कारणाने व्यक्त झाली नाही तर ते आणखीनच अस्वस्थ होतात नि अभिव्यक्तीचा स्फोट होऊन क्रांतीची पहाट दिसू लागते. हे इतिहासाने अनेकदा सिध्द केले आहे. आज जगातील एकूण मानवाचं अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या कोरोना महामारीच्या वर्तमानात विवेकी-अविवेकी, संवेदनशील-असंवेदनशील असे सगळेच अस्वस्थ आहेत, अवघा वर्तमान अस्वस्थ आहे, म्हणून 'अस्वस्थ वर्तमान.'

या कोरोना-महामारीविरुध्द समाजातील अनेक घटक जबाबदारी आणि कर्तव्य म्हणून प्राण पणाला लाऊन लढत आहेत. त्यामध्ये डॉक्टर्स, सफाई कामगार, प्रशासन, पोलिस इत्यादींचा सहभाग दखलपात्र. अशा या 'अस्वस्थ वर्तमाना'त कलावंत कोणती आणि कशी भूमिका पार पाडताहेत यासंबंधीचं हे एक टिपण. मात्र येथे सर्वच क्षेत्रातील कलावंतांचा विचार केलेला नाही. किंवा कोणा एका कलावंताच्या सर्व कलाकृतींचाही विचार केलेला नाही. काही चित्रकार, शिल्पकार, फोटोग्राफर, कवी यांच्या काही कलाकृतींचा प्रातिनिधिक स्वरुपात विचार केला आहे.

Duane Preble आणि Sarah Preble यांच्या ARTFORMS (Second Edition) या पुस्तकात शेवटचे प्रकरण आहे. 'WHAT CAN ART DO FOR THE PRESENT AND THE FUTURE? त्याचे पुन्हा दोन भाग केलेत. 1) ART REVEALS THE PROBLEM आणि 2) ART HELPS FORM THE SOLUTION म्हणजे कला समस्येला उजेडात आणते आणि तिच्या सोडवणुकीचे सूत्रही मांडते. कलावंतांने या दोन्ही कसोट्या पूर्ण करायच्या तर त्यासाठी वर्तमानाला थेट भिडणं, वर्तमानाचं संदर्भासह आकलन करुन घेणं, त्याचा अचूक अन्वयार्थ लावणं आणि पथदर्शक भाष्य करणं आवश्यक ठरतं.

एकूण मानवी अस्तित्वच धोक्यात आणणाऱ्या कोरोना महामारीमुळे 'आज जिवंत राहणे' ही मोठी आणि प्राथमिक समस्या म्हणून पुढं आलेली आहे . अगदी उद्योगपती रतन टाटापासून ते गावपातळीवरच्या कार्यकर्त्यापर्यंत सगळेच म्हणताहेत की, 'जिवंत कसे राहायचे, त्याची काळजी घ्या. बाकी सगळ्या गोष्टी गौण'. परंतु व्यक्ती व मानवी समूह जिवंत असणे म्हणजे काय? केवळ श्वाच्छोच्छ्वास चालू असणे म्हणजे जिवंत असणे काय? माणसाच्या, 'Man is a social animal पासून ते, Man is laughing animal

पर्यंत अनेक व्याख्या केल्यात. आणि आज आपण अनुभवित आहोत की आजचा माणूस सामाजिकतेपासून बेदखल झालाय. तसाच तो हसण्यापासूनही बेदखल झालाय. एका उर्दू कवितेत म्हटलंय,

'तकल्लुफसा आ ही जाता है मेरे हँसी में।

सलीका भूल चुका हुँ मुस्कुराने का ।।

आजच्या माणसांची काहीशी अशीच अवस्था झालीय. तो जसा हसणारा प्राणी राहिला नाही तसाच तो सामाजिक प्राणीही राहिला नाही.

मात्र इतकी प्रतिकुल परिस्थिती निर्माण झालीय तरीही दुर्दम्य इच्छा आणि जिद्दीच्या जोरावर माणूस न हारण्याच्या इराद्याने लढतोय! हे विशेष! Ernest Hemingway यांची एक प्रसिध्द कांदबरी, 'The old man and the sea' त्यात म्हटलंय की, 'But man is not made for defeat." He said, "A man can be destroyed but not defeated'' आणि आज आपण अनुभवत आहोत की, जगातील प्रत्येक माणूस आपला प्राण पणाला लावून या कोरोना महामारीविरुध्द एक योध्दा म्हणून लढतोय. मग या जागतिक लढ्यापासून कलावंत स्वतःला अलिप्त कसा ठेवू शकतो? शिवाय कलावंत असण्यापूर्वी तोही. 'माणूस'च असतो. त्यामुळे त्याची 'माणूस' म्हणून आणि कलावंत म्हणूनही अशी दुहेरी लढाई चालू आहे.

कोरोना-महामारीविरुध्दचा प्रशासकीय लढा म्हणून अगदी अल्पकालीन सूचना देऊन देशात लॉकडाऊन जाहीर करण्यात आले. त्यामुळे मूळ समस्येबरोबरच इतर समस्यांनीही आक्राळ-विक्राळ रुप धारण केले. आरोग्यविषयक समस्येबरोबरच, स्थलांतर करणाऱ्यांची समस्या, त्यांच्या वाहतुकीची समस्या, हातावर पोटं असणाऱ्या मजुरांच्या उदरनिर्वाहाची समस्या, कोलमडलेले आथिक धोरण आणि नियोजन, शैक्षणिक क्षेत्रातील समस्या, कोरोना व्यतिरिक्त आजाराने ग्रस्त असलेल्यांची समस्या, कोरोना-महामारीविषयी संभ्रम आणि असुरक्षितता वाढविणारी माहिती आणि त्यामुळे नैराश्येत गेलेल्यांची समस्या. या सगळ्या समस्यांकडे एक नजर टाकल्यास लक्षात येतं की या समस्यांचं स्वरुप हे प्रतित्यसमुत्पादसिध्दांतातील कार्यकारणसंबंधासारखं आहे, म्हणजे ज्याप्रमाणे कारणाचा कार्य हा जरी परिणाम असला तरी तेच कार्य पुढच्या कार्याचे (परिणामाचे) कारण बनते. इथं नेमकं तसंच घडतंय.

या समस्या आणि परिणामांच्या संदर्भात ज्या कलावंतांनी आपापल्या माध्यमातून स्वतःला व्यक्त केलंय त्यामध्ये अपवाद वगळता प्रामुख्याने समस्येपेक्षा परिणामालाच अधिक चित्रबध्द, फोटोबध्द आणि शब्दबध्द केलंय. काहींच्या कलाकृतीतून सूचकतेने कारणांकडे निर्देश होतोय इतकंच. कलावंतांनी आपापल्या क्षमतेनुसार आणि माध्यमांच्या मर्यादेत 'अस्वस्थ वर्तमान' आणि त्यामुळे निर्माण झालेली कलावंतांची घालमेलही कलाकृतीतून व्यक्त केलीय. या तशा अल्पजीवी अनुभवाला कलाकृतींच्या माध्यमातून दीर्घजीनी बनविलंय. त्यामुळं त्यांच्या कलाकृतीचं मूल्यमापन केवळ आजच होईल असं नाही तर ते उद्याही होऊ शकतं. शिवाय प्रत्येक कलाकृती Unique असते असं जरी काही कलाभ्यासकांचं मत असलं तरी, प्रत्येक कलाकृती Unique असण्याऐवजी किंवा Unique असण्याबरोबरच ती Dynamic असते. म्हणून तिच्यातून एकापेक्षा अधिक अर्थ निघू शकतात.

शिल्प –

चित्रकार आणि क्युरेटर प्रभाकर कांबळे यांचं 'ब्रोकन फूट' एक मांडणी शिल्प. ते कालच्या नि आजच्याही 'अस्वस्थ वर्तमाना'वर कलात्मक भाष्य करतं. क्युरेटर प्रभाकर कांबळे आणि क्युरेटर रुमी समाधान यांनी, 'ब्रोकन फूट: अन्फोल्डिंग इनइक्वॅलिटी' या विषयावर (Theme) साठ कलाकारांच्या कलाकृतीचं ऑन–लाईन प्रदर्शन आयोजित केलेलं. तरीही 'ब्रोकन फूट' ही एक स्वतंत्र कलाकृती म्हणूनही ग्रेटच. या मांडणी शिल्पाचं कलामूल्यही थोरच. शिवाय ती भारतीय संविधानाला अभिप्रेत असलेल्या सामाजिक समतेच्या नि न्यायाच्या आशयाला अस्वस्थ वर्तमानातही कसे नि किती नाकारले जात आहे त्याचे अस्वस्थ करणारे भानही देते. Unfolding Inequality चे दोन अर्थ संभवतात एक, विषमतेचे उघड प्रकटीकरण दोन, न संपलेली किंवा न संपणारी विषमता. अर्थात इतर कलाकृतीप्रमाणे ही कलाकृतीही Dynamic असल्याने तिच्यातून आणखीही काही अर्थ निघू शकतात. 'ब्रोकन फूट' हे प्रतिक आहे, इथल्या तुटलेल्या समाजाचे, ज्यांना शतकानुशतके स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायापासून अलग ठेवले आहे. त्यांच्याशी भेदभावपूर्ण वर्तन केले आहे, आणि ही भेदभावपूर्ण वागणूक कोरोना–महामारीच्या काळातही न संपता तिचे उघडपणे अमानवी प्रकटीकरण होत आहे. त्या 'ब्रोकन फूटा'च्या दुंभगलेपणाकडे पाहिल्यावर जाणवते की हे 'तुटलेले लोक' सामाजिक विषमतेच्या भळभळल्या जखमेला सोबत घेऊन शतकानुशतकाचा यातनामयी प्रवास करीत आहेत. विशेष म्हणजे या 'ब्रोकन फुटा'कडे आणखी बारकाईने पाहिल्यास आपणाला जाणवते की, तो चकचकीत आणि सुंदर असा रेखीव दिसतो. परंतु शिल्पकाराने त्या शिल्पाची मांडणी करताना तो पाय उभा चिरून विद्रुप केलाय.एका अर्थाने पारंपरिक सौंदर्यकल्पनेलाच छेद दिलाय.पारंपरिक सौंदर्यमूल्ये नाकारली. कारण तुटलेल्या लोकांच्या जीवनामध्ये त्यांना स्थान नाही. या मांडणी शिल्पातून सूचकपणे व्यक्त होणारा आशय मला अधिक महत्त्वाचा वाटतो. आणखी एक मुद्दा, हा तुटलेला जसा 'पाय' आहे तसाच तो व्यक्तीसह समाजाच्या देशाच्या उभं राहण्याचा, प्रगतीचा, अस्तित्वाचाही 'पाया' आहे. पण येथे तर हा पाय तुटलेला आणि चिरलेला आहे. कोरोना–महामारीच्या या अस्वस्थ वर्तमानात असा पाय, लाखो मजूर शेकडो कि.मी. चे अंतर चालून आपापल्या घरी पोहचले, त्यांच्या पायांची जी अवस्था झाली त्याचेही प्रतिक आहे. त्यामुळे त्या तुटलेल्या आणि चिरलेल्या पायाकडे पाहून कोणाही संवेदनशील माणसाच्या मनात एक 'अपराध–जाणीव' निर्माण झाल्याशिवाय राहात नाही. आणि ही बाब मला सर्वाधिक महत्त्वाची वाटते. तुटलेल्या 'पाया'वर काहीही उभं राहू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या 'Annihilation of Caste या लिखित भाषणात भारतीयांना इशारा देतात "You cannot build anything on the foundation of caste. You cannot build up a nation, you cannot build up a morality. Anything that you will build on the foundation of caste will crack and will never be a whole." म्हणजे जातीच्या पायावर या देशात काहीही उभं करु शकत नाही. राष्ट्र, नैतिकता असं काहीच उभं करु शकत नाही आणि काही उभं केलं तर त्याला तडा जाईल आणि ते पुन्हा कधीच एकजीव होणार नाही. कारण जातीचा पाय म्हणजे विषमता ,गुलामगिरीचा, माणसा–माणसांमधील वैरभावनेचा, अन्यायाचा, जात्यांधतेचा नि धर्मांधतेचा पाया होय. जेथे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि सेक्युलॅरिझम या भारतीय संविधानाला अभिप्रेत असलेल्या मूल्यांचा पूर्णपणे अभाव. या सगळ्या आशयाला कवेत घेणारं हे मांडणी शिल्प आहे. ते समस्येला प्रकट करते, आणि कारणांचा शोध घेऊन सूचकपणे उपायही सुचविते.

**चित्र–**

करोना–महामारीमुळे निर्माण झालेल्या 'अस्वस्थ वर्तमाना'वर एक प्रतिक्रिया म्हणून का असेना काही चित्रकारांनी काही कलाकृती निर्माण केल्यात. त्यातील काही चित्रकारांच्या काही कलाकृतीसंबंधी येथे नोंद घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

कोरोना–महामारीवरचा एक उपाय म्हणून अत्यल्प काळाची सूचना देऊन देशभर लॉकडाऊन घोषित करण्यात आला. मुंबईसारख्या औद्योगिक शहरात देशभरातून रोजगारासाठी आलेल्या मजुरांच्या समस्येने आक्राळ विक्राळ रुप धारण केले. त्यातून त्यांनी स्वीकारलेला एक पर्याय म्हणजे आपापल्या प्रदेशात गावी जाणे. त्यातून त्यांच्या वाहतुकीची समस्या पुढे आली. मग शेवटचा पर्याय म्हणून त्या मजुरांनी रस्त्याशीच आपल्या पायाचं घट्ट नातं जोडलं आणि देशभरातून काही लाख लोक शेकडो मैलांच्या प्रवास देशभरातील रस्त्यावरून पायी चालत सुरु झाला. त्यामध्ये वृध्द, लहान बालके, गरोदर स्त्रिया, आजारी लोकांची, अन्नपाण्याविना, औषधाविना, वाहतुकीच्या साधनाविना जी परवड सुरु झाली ती मन 'सून्न' करुन टाकणारी. त्यातील काही रस्त्यात मेलेही. या त्यांच्या दुःखाला, यातनेला, असहाय्यतेला आणि अगतिकलेला काही कलावंतांनी कलाकृतींच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला.

चित्रकार सुनिल अवचार यांनी या विषयावर अधिक प्रमाणात रेखाटने केलीत, ती समाजमाध्यमाच्याद्वारे अनेकापर्यंत पोहचलीत. तांत्रिक आणि पारंपरिक अर्थात त्यांच्या रेषेला कलात्मकता, लय आवश्यक तेवढी नसेलही परंतु विषय–वास्तूशी आणि त्यानुषंगिक वास्तवाशी थेटपणे भिडण्याची आणि रसिक / प्रेक्षकांना 'अस्वस्थ ' करुन ' घायाळ ' करण्याची ताकद निश्चितच त्यांच्या रेखाटनमध्ये आहे . त्यांचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांनी केवळ स्थलांतरीतांच्या समस्येला आपल्या रेखाटण्याचा विषय बनविला नाही तर, ' अविवेकी आणि पक्षपाती मिडिया, कोरोना काळातील जातीय हिंसाचार यासारख्या अन्य विषयावरीलही त्यांची रेखाटने रसिक/प्रेक्षकांना प्रभावित करताहेत. जे शब्दातून मांडायचे तेच ते रेखाटनांच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करताहेत. शाब्दिक भाषेची जशी आणि ज्या प्रमाणात सार्वत्रिक साक्षरता झालीय तशीच त्यांच्या रेषेचीही झाली असल्यामुळे ती सगळी रेखाटने आशयाच्या अणकुचीदारपणासह प्रेक्षकाच्या मेंदूत थेट घुसतात. त्यामुळे त्यांच्या रेखाटनातील आशयाला शाब्दिक पाठबळाची गरज भासत नाही.

चित्रकार अन्वर हुसेनच्या रेखाटनांचा विषयही स्थलांतरितांच्या समस्या हाच आहे. सायकलसारख्या मिळेल त्या वाहनाने, जथ्येच्या जथ्थे रस्त्यावरुन अनवाणी पायांनी चालत आहेत. त्यांच्या रेषेला एक लय आहे, स्पष्टता आहे. स्थलांतरित मजूरांच्या डोक्यावर, खांद्यावर आणि हातातही लहान–मोठी ओझी आहेत. एखादा हात मोकळा राहिलाच तर तो लहानग्यांना चालण्यासाठी आधार देतोय. आणि असे जथ्येच्या जथ्ये अनवाणी पायांनी तो हमरस्ता तुडवताहेत. सोबतीला क्षणोक्षणीची असूरक्षितता . आणि पार्श्वभूमीवर आहेत भव्य इमारती. ज्या याच मजुरांच्या कष्टावर उभ्या आहेत. परंतु त्यावर आता त्यांची मालकी नाही, म्हणून शेकडो इमारती बांधूनही बेघर. या भव्य इमारती आणि त्या उभ्या करणाऱ्यांची ही परवड हा विरोधाभास मानवी शोकांतिकेच्या टोकावर नेऊन सोडतो. आणि रसिक/प्रेक्षक अपराधी जाणीवने तळमळायला लागतो. अन्वरच्या रेखाटनांतील हीच ताकद!

चित्रकार विक्रांत भिसे यांनीही या स्थलांतरित मजूरांच्या यातनांना आपल्या रेखाटनांचा आणि पेंटिंग्जचा विषय बनविलाय, त्यामध्ये लहान मुलाला एका हाताने छातीशी कवटाळून दुसऱ्या हातात ओझं सांभाळत एक स्त्री चालते आहे. तिची अशा या अवस्थेतही जगण्याची जिद्द जिवंत आहे. दुसऱ्या कलाकृतीत एका खांद्यावर ओझे तर दुसऱ्या खांद्यावर लहान मुलगी आणि तिच्यापेक्षा किंचित मोठं वाटणारं चालणारं पोरगं. तसेच पाण्याच्या, दुधाच्या टँकरमधून मृत्यूला स्पर्श करीत प्रवास करणारे मजूर. त्यांच्या एका कलाकृतीत तर एक केवळ हाडाचा सांगाडा (प्रेतच म्हणा की) पण तरीही त्याच्या खांद्यावर, डोक्यावर ओझे आहेच. अशी अनेक रेखाटने आणि पेंटिग्ज त्यानी निर्माण केली आहेत. त्यांचं आणखी एक पेंटिंग, त्यामध्ये त्यांनी कोरोना उपचार केंद्र दाखविलंय. भरपूर खाटा. परंतु त्यातील एखाद–दुसरीच मोकळी नाही तर बाकीच्या सगळ्या कोरोना–बाधितांनी भरलेल्या आणि बाहेर मात्र चारी बाजुनी कोरोना बाधितांच्या रांगाच रांगा लागल्यात. हे चित्रच इतकं बोलकं आहे की, आरोग्य क्षेत्रातील उणीवा आणि ताण यावर शाब्दिक भाष्याची गरज भासू नये. विक्रांतची अशी ही सगळी चित्रे 'अस्वस्थ वर्तमाना'ला आणखी 'अस्वस्थ' करीत असली तरी सूचकतेने का होईना या 'अस्वस्थेवर उपाय शोधण्याची कृतीशील प्रेरणाही देतात.

चित्रकार पिसुर्वोने या 'अस्वस्थ वर्तमाना'ची आपल्या कलाकृतीच्या माध्यमातून गांभीर्याने दखल घेतलेली दिसून येते. त्यांच्या एका चित्रात स्थलांतरित वाटावेत असे दोन मजूर दोन दिशांनी चालताना दाखविलेत. त्या चित्राचे प्रथमदर्शनी जाणवणारे वैशिष्ट्य म्हणजे त्या दोन्ही व्यक्तिरेखा या राकट, रासवट, हातपाय दणकट, काहीसे स्थूल वाटावेत अशा पण स्थूल नव्हेत. (साधारणतः १९७०–८० च्या दशकात आपल्याकडे फुले–आंबेडकरी चळवळीतून जागे झालेले काही चित्रकार अशा प्रकारची व्यक्तिचित्रे काढीत) आणि त्यांच्या डोक्यावर खांद्यावर त्यांच्या ताकदीपेक्षा जड वाटावीत अशी ओझी. चालताना जणू ते एकेक पाऊल मोठ्या कष्टाने टाकताहेत असे वाटते. ग्रीक पुराणकथेतील ॲटलसला त्याच्या चुकीबद्दल शिक्षा म्हणून पृथ्वी खांद्यावरुन वाहून न्यावी लागते. पण येथे तर या माणसांची चूक तर कोणतीच नाही. आणि शिक्षा मात्र मरणयातनांची! ॲटलस हे ताकद आणि सहनशीलतेचं प्रतीक मानलं जातं. इथल्या ताकदवर आणि सहनशील मजुरांनाही लागू होते. पण आमची चूक नसताना आम्हांला ही शिक्षा का? असा प्रश्न जेव्हा त्यांच्या मेंदूत निर्माण होईल. त्या क्षणी त्यांच्यातील सहनशीलताही नष्ट होईल आणि उद्रेक होईल अशी एक सुप्त शक्यताही पिसुर्वोने या चित्रातून व्यक्त केलीय असं त्या चित्राकडं थोडं गांभीर्यानं पाहिल्यावर लक्षात येतं.

चित्रकार संजीव सोनपिंपरे यांची चित्रे म्हणजे तर मानवाकडून मानवाची होणाऱ्या छळांची–यातनांची जणू क्रोनोलॉजि. ती भौमितीय पध्दतीनं छाटलेली वेगवेगळी मुंडकी जणू गिलोटिनमधून बाहेर पडलेली पण त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव मात्र गिलोटिनमध्ये जाण्यापूर्वीचे थिझलेल्या आक्रोशांचे, तुम्ही कोणत्याही धर्माचे संस्कृतीचे प्रतिनिधी असा हिंसेची अनिवार्यता तुमच्या मेंदूत ठासून भरलीय. त्यातूनही तुम्ही हातावर हात नि तोंडावर बोट ठेवलेत तरी तुम्ही धार्मिक–सांस्कृतिक दहशतवादाचे बळी होण्यावाचून स्वतःला वाचवू शकत नाही.मग या चित्रांच्या एकच अर्थ निघतो की हे सगळ कोल्ड मर्डर्स सिरियलचे बळी आहेत. (Victims of cold murders serial) मग एखाद्या शिक्षण व्यवस्थेकडून घेतला गेलेल्या रोहित वेमुलासारख्याचा बळीही त्याच सिरियलचा भाग बनतो. चित्रकार संजीव सोनपिंपरे यांचंच रोहित वेमुलावरचं अतिशय प्रेरक असं चित्र आहे. उद्या अनेक रोहित वेमुला तयार होतील पण ते स्वहत्या करणाऱ्या वेमुलाचे प्रतिनिधी नसतील तर वेमुलाला ज्या व्यवस्थेने स्वहत्या

करण्यास भाग पाडले. त्या व्यवस्थेविरुध्द लढणारे वेमुला तयार होतील अशी प्रेरणा त्या चित्रातून मिळते. तसेच या कोल्ड मर्डर्स सिरियलच्या बळींची चित्रे पाहूनही त्या व्यवस्थेच्या मूळावरच घाव घालावा असं वाटून जातं. किमान त्या हिंसक अशा अन्यायी व्यवस्थेविरुध्द चीड तरी निर्माण होतेच. संजीव सोनपिंपरेसारख्या वैचारिक बांधिलकी मानणाऱ्या सृजनशील कलावंताची हीच तर अपेक्षा असणार!

चित्रकार सुरेश पंडित यांनीही या 'अस्वस्थ वर्तमाना'च्या 'अवस्थे'वर 'निःशब्द'तेची 'सुन्न' करुन टाकणारी एक जबरदस्त 'निःशब्द' क्रोनोलॉजी आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून मांडलीय.

चित्रकार नंदकुमार जोगदंड यांची चित्रे म्हणजे जणू धारदार शस्त्रेच. जी प्रस्थापित व्यवस्थेवर थेट प्रहार करताहेत. विशेषतः जात्यांध नि धर्मांध व्यवस्थेवर प्रतिकात्मकतेच्या आधाराने त्यांची चित्रे सातत्याने आघात करताना दिसतात. प्रतिकं ही सुध्दा बहुआयामी असू शकतात की ज्यामधून एकापेक्षा अनेक अर्थ निघू शकतात. परंतु नंदकुमार यांच्या कलाकृतीमधील प्रतिकं आणि आशय एकजीव झालेली दिसतात. त्यामुळं या प्रतिकाचा अर्थ काय ? पुस्तकी –पंडित प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही . फुले– आंबेडकरी वैचारिक आणि समाजिक बांधिलकीचा सशक्त अविष्कार म्हणजे नंदकुमार यांच्या कलाकृती होत.

चित्रकार राजू बाविस्कर यांच्या चित्रांबद्दल जाणवणारी पहिली गोष्ट म्हणजे सर्वसामान्यपणे सामान्य माणसांचा जो स्तर आहे, त्याच्याही खालच्या स्तरावर जगणाऱ्या माणसांच्या नि:सत्व जगण्याला–त्यांच्या संघर्षाला आपल्या कलाकृतीतून मांडतात. त्यामुळं त्यांची चित्रं ही सर्वसामान्य माणसांच्या मनामध्येही अपराध–जाणीव निर्माण करतात. त्यांच्या एका चित्रामध्ये एक तुटकं चप्पल आणि त्यावर झोपलेला माणूस दाखविलाय. आणि त्या चप्पलेचा एक तुकटा बंद तीन–चार कुत्री ओढताहेत. ते चित्र पाहताच अण्णाभाऊ साठे यांच्या 'स्मशानातील सोनं' या कथेतील १०–१२ कोल्ही विरुध्द भीमा म्हणजेच पशू आणि मानव यांच्यातील जिवाच्या आकांताने मृतदेह आणि प्रेतावरील सोन्यासाठीचा चालंलेल्या संघर्षाच्या प्रसगांची आठवण होते. परंतु या चित्रात त्याहूनही अधिक खूप काही जाणवते. येथे त्या तुटक्या चप्पलेचं मानवीकरण (Humanization) करण्याची आवश्यकता भासत नाही. कारण येथे तर चप्पल आणि माणूस अगोदरच एकजीव झालेत. एका स्तरावर आलेत. आणि त्याव्दारे शब्दशः आणि चित्रशः कुतरओढ दाखविली आहे. मानवी शोकांतिकेचे एक शोकात्म प्रतिक म्हणूनही या चित्राकडे पाहता येईल. अशा चित्रांची एक मालिकाच होऊ शकेल. फार तर त्यातील आकार (FORMS) वेगवेगळे दिसले तरी आशयामध्ये फारसा फरक जाणवणार नाही. सामान्य माणसांच्याही तळाशी असलेल्या उद्ध्वस्त आणि गलितगात्र झालेल्या माणसांशी बांधिलकी हीच राजू बाविस्करांच्या चित्रातील दखलपात्र ताकद आहे. आणि ती प्रत्येक चित्रागणिक वाढतेच आहे.

चित्रकार गोपाळ गंगावणे यांनीही या 'अस्वस्थ वर्तमाना'चा आपल्या पध्दतीने अन्वयार्थ लावून त्यावर कलाकृतींच्या माध्यमातून भाष्यही केले आहे. त्यांच्या कलाकृतीत जीवनानुभवाला दिलेली ज्ञानानुभवाची जोड प्रकर्षाने जाणवते . त्यांनी आपल्या एका कलाकृतीत 'The Thinker ' चित्रित केलाय . अर्थात ती आग्युस्त रोदाँच्या जगप्रसिध्द The Thinker ची चित्रमय प्रतिकृतीच वाटावी. रोदाँचा Thinker हा विचारमग्न, नग्न, दणकट पुरुष. त्यामध्ये ताकद आणि एकाग्रता या परस्परविरोधी घटकांचा अविष्कार दिसून येत असल्याचे काही कलाभ्यासकांचे मत असले तरी गोपाळ गंगावणे यांच्या कलाकृतीतील विरोधाभास हा रचनेबरोबर आशयाशी अधिक निगडीत आहे. किंबहुना रोदाँच्या शिल्पातील The Thinker मधील ताकदीच्या

दुष्परिणामाला गोपाल गंगावणेनी त्यांच्या चित्रात वेगळ्या पध्दतीने अधोरेखित केले आहे, असे वाटते. म्हणजे ताकदीची संरचना ही कशी सामान्य माणसामध्येही विषमता निर्माण करते याचा उलगडा ही कलाकृती करते. गोपाळच्या चित्रातील The Thinker हा रोदाँच्या शिल्पातील The Thinker प्रमाणेच विचारमग्न, नग्न आणि दणकट पुरुष दाखविलाय. आणि त्याच्या पुढ्यात एका काचपेटीत भाकरी बंदिस्त आहे. आणि काचपेटीबाहेर गांधीजींच्या तीन माकडांची आठवण व्हावी अशी तीन कुपोषित, भुकेली तीन मुले. ज्यांच्या मूलभूत गरजा आणि भवितव्यही जणू त्या काचपेटीत बंदिस्त केले आहे. या पार्श्वभूमीवर पुन्हा त्या ताकदवान थिंकरकडे पाहिले तर वाटते की तोच त्या पेटीतील भाकरीचे आणि त्या मुलांच्या भवितव्याचे त्यामुलापासून आपल्या ताकतीच्या जोरावर रक्षण करतो आहे. हा विस्मित करणारा विरोधाभास आहेच. शिवाय आज जगातील महासत्तेने मानवी जीवनात विषमता आणि विरोधाभासाची मानवाला देणगी दिलीय, ही अस्वस्थ करणारी वैचारिक भावना गोपाळ यांच्या कलाकृतीने जागी होते.

त्याचं दुसरं एक चित्र आहे. त्यामध्ये बुध्दाची प्रतिमा आहे. उजव्या कुशीवर शांतपणे पहुडलेली आणि बाजूलाच निर्भयपणे बसलेले हरिण. त्या चित्राचे शीर्षक आहे Metta, म्हणजे मैत्री. अर्थात बुध्द शिकवणुकीमधली मैत्री ही केवळ माणसामाणसामधील मैत्री नाही तर ती माणून+पशूपक्षी+अवघा निसर्ग अशी ती मैत्री आहे. धम्मपदात एक गाथा आहे. मराठी भावार्थ असा की, 'वैराने वैर संपत नाही, तर प्रेमाने वैर संपते.' आता या चित्राच्या वर्तमानकालीन अस्वस्थेमधील कसा नि काय संबंध? तर तो फारच घनिष्ट संबंध आहे. आज कोरोना–महामारीने सगळे मानवी जग एका इवल्याशा विषाणूमुळे त्रस्त झाले आहे. परंतु काही हजार वर्षांचा जरी इतिहास धुंडाळला तरी आपल्या लक्षात येईल की, या सगळ्याला माणूसच बहुतांशी जबाबदार आहे. या जगात केवळ जगण्याचा नव्हे तर या जगावर मालकी स्थापित करण्याचाही आपलाच अधिकार आहे असे समजून माणसाने निसर्गावर, पशूपक्षावर, जीवाणू–विषाणूवर केवळ मालकीच स्थापित करण्याचा प्रयत्न केला असे नव्हे तर त्यांचे अस्तित्वच धोक्यात आणले. 'जीवो जीवस्य जीवनम्' हे काही अंशी खरे असले तरी माणसाने ते मर्यादित अर्थाने घ्यायला हवे होते. परंतु माणसाने कोणत्याच बाबतीत कसलीच मर्यादा ठेवली नाही. त्याचाच हा सगळा परिणाम. गोपाळ गंगावणे यांनी 'अस्वस्थ वर्तमाना'तील परिणामांचा, त्यामागील समस्यांचा, कारणांचा वेध घेऊन त्यावर 'सर्वांशी मैत्री' हा बुध्द शिकवणुकीतील उपाय सदर चित्राच्या माध्यमातून मानवासमोर ठेवलाय.

चित्रकार मयुरी चारी यांच्या कलाविष्काराचे माध्यम थोडे वेगळे असले तरी वैचारिक आशय बुध्द, फुले–आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर आणि विशेषतः भारतीय संविधानातील मूल्यावर आधारित आहे. विशेषतः स्त्रीकेंद्री स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी संविधानिक मूल्यांचा कलाविष्कार त्यांच्या कलाकृतीतून प्रकर्षाने जाणवतो त्यांनी कापडावर विणकाम करून त्या साकारल्यात . त्यातील एका कलाकृतीमध्ये एक स्त्री सायकल चालवते आहे, आणि मागे एक पुरुष बसला आहे. हे चित्र लॉकडाऊनमधील आहे कारण त्या दोघांनीही मुखपट्ट्या घातलेल्या दिसताहेत. या चित्राचं शीर्षक आहे. 'LIBERTY'. तर दुसरं एक असंच चित्र आहे की ज्यामध्ये एक स्त्री आपल्या बाळाला घेऊन चालली आहे. कदाचित ते बाळ फिमेल असावे. हेतू हा की मुलगी जन्माचे स्वागत समतेच्या विचाराने करावे म्हणून या चित्राचे शीर्षक आहे 'EQUALITY'. तिसरं चित्र आहे JUSTICE या शीर्षकाचं. थोडक्यात, भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत

भारतीय लोकांनी भारतीय लोकांना स्वातंत्र्य, समता, न्याय इ. ज्या मूल्यांच्या संभाव्य देवाण घेवाणीने आश्वासित केले आहे, त्याच मूल्यांचा जागर चित्रकार मयुरी चारींच्या कलाकृती करताहेत. या कलाकृतीमधील बारीक कलाकुसर हा कलात्मकतेचा आणि सौंदर्यशास्त्रीय मुद्दा आहे त्याची चर्चा वेगळी/स्वतंत्रपणे होऊ शकते. परंतु या कलाकृती 'अस्वस्थ वर्तमाना'तही भारतीय नागरिकांना त्यांच्या संविधानिक मूलभूत हक्काची/जबाबदारीची जाणीव करुन देतात, हे निश्चित.

चित्रकार तेजस्वीनी सोनावणे यांच्या कलाकृतीची प्रतही काहींशी मयुरी चारी यांच्या कलाकृतीसारखीच. कापडावरील कलाकृती हे दोन्हीमधील ठळक साम्य. अर्थात तपशीलात्मक फरक आहेच. तेजस्वीनी सोनावणे यांच्या कलाकृतींना 'छापाचित्र' किंवा 'मुद्राचित्र' असं म्हटलं जात. अर्थात याच प्रकारात यापुर्वी राजा रवी वर्माने लक्ष्मी, सरस्वतीच्या प्रतिमा घरोघरी पोहचाव्यात म्हणून 'शिळामुद्रणा'चा वापर केला होता. तेजस्वीनी शिळेऐवजी लाकूड आणि मेटलच्या वापर करताना. परंतु त्यांच्या कला निर्मिती प्रक्रियेपेक्षा त्यातील आशय अधिक महत्त्वाचा वाटतो. त्यांनी एक वेगळाच परंतु मूलभूत असा विषय आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून हाताळला आहे. 'स्त्री'चं स्वातंत्र्य, तिचं व्यक्तित्व, तिची गुलामगिरी नि तिची मुक्ती हे तसे परिचित पण महत्त्वाचे विषय हाताळलेत. परंतु त्यांच्या कलाकृतींचं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी त्यांच्या कलाकृतीत एकातएक अशा मानवी–पशू पक्षांचे दर्शन घडविले आहे. म्हणजे ते चित्र मानवाचे, पशूचे आणि पक्षांचेही किंवा सगळ्यांचे एकच. माणूस–पशू–पक्षी यांतील स्वभाव वैशिष्ट्यांची एकात्मकता सोनावणे यांनी जैविक एकात्मतेत आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून रुपांतरित केली आहे. त्यातून काही प्रश्नांची उत्तरे जशी मिळतात तसेच काही मूलभूत प्रश्न निर्माण होतात. जे विवेकी नि संवेदनशील माणसांना अस्वस्थ करतात.

सुष्ट –दुष्ट अशा स्वभावाचं एकेक प्रतीक म्हणून पशु – पक्षांना गणण्यात आलं . उदाहरणार्थ कुत्र्याचा प्रामाणिकपणा, कोल्हयाची लबाडी इत्यादी अर्थात हा सगळा प्रकार माणसाच्या बुध्दितूनच स्त्रवलेला. मग प्रश्न निर्माण होतो माणसांची 'ओळख' काय? जातककथेमध्ये 'गरहित जातक' नावाची एक जातककथा आहे. त्यामध्ये एक वानर माणसांच्या जगात काही दिवस राहिल्यानंतर ते पुन्हा आपल्या वानरांच्या कळपात जाते. तेव्हा बाकीची वानरं त्याच्याकडून माणसांच्या जीवनाबद्दल त्याच्या जगण्याबद्दल, त्याच्या व्यवहाराबद्दल जाणून घेऊ इच्छितात. ते वानर म्हणते, 'मला त्या माणसांच्याबद्दल काही विचारु नका. परंतु जास्तच आग्रह केल्यावर तो सांगू लागतो की, 'माणूस मग तो कोणीही असो, तो सारखं 'हे माझं, ते माझं, सोनं माझं, हिरण्य माझं. असं सतत म्हणत असतो. वास्तविक 'जे जे अस्तित्वात आहे ते ते नाशवंत आहे हे त्यांना अजूनही कळलेले नाही.' असे म्हणून ते वानर जेव्हा माणसाविषयी आणखी काही माहिती सांगू लागले तेव्हा त्या सगळ्या वानरांनी दोन्ही हातानी आपापले कान बंद केले नि, 'सांगू नका, सांगू नका, न ऐकण्यासारखी गोष्ट आज आम्ही ऐकली, अनुचित गोष्ट ऐकली' म्हणत ती सगळी वानरं तिथून निघून जातात. इथे एक गोष्ट मान्य की, वानराच्या दृष्टीने 'माणसाचं' जे वर्णन केले आहे तेही माणसाचच चिंतन. तरीही पशू–पक्षाच्या दृष्टीतून आणि स्वतः माणसाच्या दृष्टीतूनही 'माणसा'ची ओळख काय नि कोणती? हा प्रश्न तसाच शिल्लक राहतो. आणि ज्याला ज्याला हा प्रश्न पडतो तो तो अस्वस्थ झाल्याशिवाय राहात नाही. फार क्वचित कलावंत असतात की जे 'माणसां'च्या संदर्भात मूलभूत प्रश्न उभे करतात. त्या मालिकेत चित्रकार तेजस्वीनी सोनावणेंचा समावेश

करता येईल . प्रत्येकाला स्वत:चा ' माणूस ' म्हणून शोध घेण्यास त्यांच्या काळाकरिता बाध्य करतात.

फोटोग्राफी -

पद्मश्री सुधारक ओलवे हे वैचारिक आणि सामाजिक बांधिलकी मानणारे एक जागतिक कीर्तिचे फोटोग्राफर. बुध्द, फुले–आंबेडकर यांच्या विचाराने त्यांचा मानववादी 'डोळा' तयार झालेला आहे. त्यामुळेच आजपर्यंत त्यांनी उपेक्षितांचं मानवी जग फोटोग्राफीच्या माध्यमातून सभ्य नि सुसंस्कृत (?) समाजापुढे ठेवले. त्यामध्ये प्रामुख्याने, सफाई कामगार, कुपोषित बालके, आदिवासी, कुमारी माता यांचा उल्लेख करता येईल. याच प्रकारच्या जगण्याचं वास्तव या कोरोना–महामारीच्या लॉकडाऊन काळातही मोठी जोखीम पत्करुन थेट रस्त्यावर उतरुन त्यांनी विशेषतः मुंबईतील सुनसान रस्ते, निःशब्द रेल्वे स्टेशन्स, बंद दुकाने, त्या सुनसान रस्त्यावरुन क्वचित ठिकाणी चालतांना दिसणारे मुंबई बाहेर पडणारे छोटे, मोठे जथ्ये आणि त्यांच्या डोक्यावर त्यांच्याच अवघ्या संसाराचे ओझे. शहरभर ठिकठिकाणी गरजू वस्तूंसाठी लागलेल्या रांगाच रांगा. प्रत्येकाच्या दारात जाऊन जीव धोक्यात घालून नागरिकांचे थर्मल स्क्रिनिंग करणारे वैद्यकीय कर्मचारी आणि अनावश्यक असे रस्त्यावरुन कोणी फिरु नये म्हणून बंदोबस्तासाठी चोवीस तास खडे असणारे पोलिस कर्मचारी. या सगळ्याला फोटोग्राफीच्या माध्यमातून लोकांसमोर आणले आहे. मुंबईसाठी हे सगळं कदाचित पहिल्यांदाच अनुभवाला येत असावं. फोटोग्राफर पद्मश्री सुधारक ओलवे यांनी आपल्या फोटोग्राफीच्या माध्यमातून आजची 'अस्वस्थ' मुंबई उद्याच्या इतिहासासाठी फोटोबध्द करुन ठेवलीय.

फोटोग्राफर अपर्णा ओलवे यांनीही हाच वसा पुढे चालविलाय . त्यांनीही मोठी जोखीम पत्करुन लॉकडाऊनचा मुंबईवर झालेला परिणामाला मोठ्या कौशल्याने आणि वेगळ्या ' नजरे ' ने फोटोबद्ध केलंय . त्यामध्ये प्रामुख्याने लांबच्या लांब पसरलेले निर्मनुष्य आणि सुनसान फुल आणि रस्ते दिसताहेत . तसेच धारावी म्हणजे छोट्या मोठ्या घरांची घनदाट वस्ती आणि त्याहूनही अधिक माणसांची सततची गर्दी. पण एका फोटोत धारावीच्या एका छोट्याशा गल्लीत एकच मनुष्य तोंडाला मुखपट्टी लावून बसलाय. कोरोना–महामारीचा नि लॉकडाऊनचा इतका वास्तव परिणाम क्वचितच कोणी टिपला असेल. हे सगळं धारावीनं आणि मुंबईनंही प्रथमच अनुभवलेलं असावं. अपर्णा ओलवे यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता जतन केलेल्या या ऐतिहासिक ऐवजाने या क्षेत्रातल्या आणि अन्य कलावंतांनाही एक अनुकरणीय धडा घालून दिलाय.

कविता–

कोरोना–महामारी आणि लॉकडाऊन यातून निर्माण झालेल्या 'अस्वस्थ वर्तमाना'ला इतर कलावंताप्रमाणेच काही कविंनी आपापल्या कवितांच्या माध्यमातून शब्दबध्द केलंय . वास्तविक या कालावधीत शेकडो –हजारो कविता या विषयावर निर्माण झाल्या असतील, पुढे कदाचित यावर पुस्तकांची मालिकाच निघू शकेल. येथे त्यातील काही प्रातिनिधिक कविंच्या प्रातिनिधिक कवितांची नोंद घेण्याचा प्रयत्न केलाय. या सर्वांमध्ये जाणवणारं वैशिष्ट्य म्हणजे हे सगळे कवी वर्तमानाला थेट भिडताहेत, आपापल्या क्षमतेनुसार त्याच आकलन करुन घेताहेत नि त्यावर मार्गदर्शक ठरावे असं भाष्यही करताहेत.

प्रतिभा जगदाळे यांनी आपल्या एका कवितेत कोरोना–महामारी आणि लॉकडाऊनमुळं निर्माण झालेल्या परिस्थितीचं अत्यंत मार्मिक शब्दात वर्णन केलंय. सूक्ष्म निरिक्षणामुळं ते वाचकांच्या अंतःकरणाला थेट भिडतं आणि कवितेतील आशयाशी तेही एकरुप होऊन जातात. कवितेच्या सुरुवातीलाच त्या लिहितात,

'सगळं थांबलंय जिथल्या तिथं,

पळणारे रस्ते स्तब्ध,

थिजल्यासारखे,

प्राणिमात्र आपल्या बिळात!'

पुढे त्या लिहितात,

'चिटपाखरुही नसलेल्या मैदानावर,

एक भटकं कुत्रं येतं आणि झटक्यासरशी ओशाळून मागं वळतं,

आपण कुठे तिसऱ्याच जगात एकटेच आलोय समजून!'

या ओळी तर प्रत्येकाच्या एकाकीपणाला गदागदा हालवून आणि हेलावून टाकताहेत. प्रत्येकालाच आपणच'त्या' कुत्र्याच्या जागी आहोत असं खरोखर वाटायला लागतं आणि एका टोकाच्या असूरक्षितपणाच्या भोवऱ्यात गरगर फिरायला लागतो. तरीही या अनुभवातून माणून काही शिकेल का? शहाणा होईल का? याबद्दल प्रतिभा जगदाळे केवळ साशंक आहेत नव्हे तर त्यांना खात्रीच आहे की 'माणूस' काही शहाणा होणार नाही. म्हणून त्या माणसाच्या टोकाच्या स्वकेंद्रीपणावर, स्वार्थीपणावर जळजळीत प्रकाश टाकताना म्हणतात,

'हळूहळू अंदाज घेऊन, प्राणीमात्र बिळाच्या बाहेर

रस्त्यावर, चौकाचौकात,

जल्लोष! आनंद, असूरी आनंद!!

आपण वाचल्याचा!

आपलाही जयजयकार!!'

आणि मग शेवटी टोकाच्या अगतिकेतून आणि चीडीतून म्हणतात,

'...आणि पुन्हा असाच मानवाचा उन्माद!

...पुढच्या भयंकर संकट समयाची चाहूल लागेपर्यंत!'

मानवी स्वभावाचं इतकं सूक्ष्म निरिक्षण क्वचितच आढळेल. प्रतिभा जगदाळेंचं हे भाष्य मानवाच्या भवितव्यासाठी निश्चितच पथदर्शक ठरणारे आहे.

कवी दयासागर बन्ने यांची 'मरणाचे बाहेर पेच' नावाची याच आशयाची एक कविता. विशेषतः लॉकडाऊनमुळे हातावर पोटं असणाऱ्यांचे हाल कवितेत मांडण्याचा प्रयत्न केलाय. कवितेच्या सुरुवातीलाच कवी म्हणतो,

'भयासुराच्या दाढेत जग

घरात न्हावा सांगता मास्तर

खळग्याना पोटाच्या कसे मी

भाकरीचे लावावे अस्तर...'

आणि असा निरुत्तर करणारा, अस्वस्थ करणारा प्रश्न ते उपस्थित करतात. कोरोना–महामारीने आणि त्यावरील उपायाने म्हणजेच लॉकडाऊनमुळे अशा या कष्टकरणाऱ्यांचे, मजुरांचे जगणेच कसे अवघड होऊन बसले आहे त्याचे हृदयस्पर्शी वर्णन करुन कवी या महामारीच्या भयानकतेची कल्पना करुन देताना म्हणतो,

'कुठून आला विषाणू हा

जगण्याचं थांबलं चाक,

स्फोट, हल्ला शस्त्रांचाही

एवढा नव्हता कधी धाक.'

बॉम्बस्फोट आणि शस्त्रांपेक्षाही धाक बसविणाऱ्या या इवल्याशा विषाणूबद्दल हतबल करणारा कवीचा प्रश्न वाचकानाही अगतिक बनवितो. आणि मग शेवटी आपल्या हातात काय आहे. तर केवळ प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कवी माणसाला सावध करताना म्हणतो,

'...जगणे घरात शोधू

मरणाचे बाहेर पेच...'

घरी राहाणं, सुरक्षित राहण्याचा सल्ला कवी आपणाला देतो. एक दुर्दम्य आशावाद आणि जगण्याची जिद्दही देतो. आणि याला अवघा मानवी इतिहास साक्षीला आहेच. कारण मानवाच्या इतिहासात मानवी अस्तित्वच नष्ट होण्याचे अनेक प्रसंग आले परंतु त्यावरही माणसाने मात करुन आपले अस्तित्व जिवंत ठेवले. म्हणून धीर धरावा, प्रतिबंधात्मक उपाय शोधावेत म्हणजे मग कवी म्हणतो त्याप्रमाणे,

'दम धरावाच थोडा

लगाम हाती असल्यावर

रेस जिंकतोच घोडा...'

आज अगतिक नि हतबल झालेल्या मानवाला जगण्यासाठी आवश्यक असणारी आश्वासकता ही कविता निश्चितच देते.

मनिषा पाटील यांनीही या लॉकडाऊनच्या काळातील बाह्य वास्तव नि आतील मानसिक घालमेल नेमक्या शब्दात आपल्या 'लॉकडाऊन' कवितेतून मांडण्याचा प्रयत्न केलाय. साधं घड्याळ बंद पडले तरी दचकून जाणारे आपण आज सगळ्यानीच तासा–मिनिटाचे काटे आपापल्या ओंजळीत का पकडून ठेवलेत? असा थेट प्रश्न सुरुवातीलाच अपस्थित करुन आपल्या अवस्थेचं वर्णन करताना मनिषा पाटील म्हणतात,

'उंच तारेवरुन चालण्याचे

करावे धाडस

आणि अशा विविक्षित क्षणी

व्हावे स्टॅच्यू!

असाही थांबतो काळ

हे तरी कुठे माहित होते

तुमच्या माझ्या पावलांना.’

खरं हे सगळे अननभूत वास्तव अनुभवताना मानवी बुध्दीचं व्याकूळपण त्यांनी नेमक्या संभाव्य प्रसंगातून नि शब्दातून व्यक्त केलंय, उंच तारेवरुन चालताना स्टॅच्यू होणं ही कल्पनाच आजच्या वास्तवाला थेटपणे अधोरेखित करते. आणि क्षणभरासाठी का असेना वाचकही ’स्टॅच्यू’ बनतो. त्यांच्या या कवितेतील एक विरोधभासी वाटावा असा एक प्रश्न मनाची घालमेल आणखीनच वाढवितो. त्या म्हणतात,

’सगळेच जाणतात

जगबुडी तर अटळ आहे

मग हा कुणी काढलाय फतवा

या प्रलयंकारी लाटांना

लॉकडाऊन करण्याचा... ?

आणि शेवटी आणखी अस्वस्थ करणारा प्रश्न विचारतात.

’कुणी सांगेल का

किती योजने दूर आहोत

तुम्ही–आम्ही

या प्रपातापासून... ?

एक गोष्ट खरीच आहे की माणसाला मरणापेक्षा त्याच्या कल्पनेचं भय अधिक असतं. मृत्यू अटळ असला तरी त्याची निश्चित वेळ माहित नसण्याच्या भरवस्यावरच मनुष्य काहीसा निश्चिंत जगत असतो. जगबुडी नि मृत्यूच्या कालिक गुढत्वाला मनिषा पाटील आपला बौध्दिक कक्षेत आणू पाहतात. परंतु तेही शक्य नसल्याने अनुत्तरित प्रश्नाच्या शेवटाने आपल्या कवितेचाही शेवट करतात. एकूण मानवी जीवनाकडे आणि भोवतालच्या जगाकडेही काळ–अवकाशाच्या परिप्रेक्ष्यात गांभीर्याने पाहायला शिकवणारी त्यांची ही एक कविता!

डॉ. अनिल मडके हे व्यवसायाने डॉक्टर असले तरी तेही एक गंभीर प्रकृतीचे कवी आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव आणि ज्ञान ते अनेकदा आपल्या कवितेतून मांडतात. आजच्या या कोरोना–महामारीच्या आणि लॉकडाऊनच्याही अगोदर म्हणजे जानेवारी, २०१९ मध्ये त्यांनी लिहिलेली, ’माणसानो, बदला आता.’ ही कविता त्यांच्या दूरदृष्टीचीही साक्ष देते. कारण आजचे वास्तव त्यांनी कालच आपल्यापुढे मांडलेय. सभोवतालच्या निसर्गाला जिवंत ठेवूनच माणूस जिवंत राहू शकतो. परंतु आजपर्यंत माणसाने निर्दयपणे सभोवतालच्या निसर्गाला नष्ट करीत आणले आहे. या प्रवृतीत विद्ध्वंसक प्रकृतीत त्याने बदल केला नाही तर माणसांचाही सर्वनाश अटळ असल्याची जाणीव करुन देताना म्हटले आहे–

’माणसानो बदला आता, बदल अटळ आहे.

अन्यथा सर्वांचं मरण अटळ आहे.

अन्यथा सर्वांचं सरण अटळ आहे.

’हवा गढूळली, ’जमीन भेगाळली’, ’पाणी आटलं, अशी सगळी दुरावस्था माणसाने केलीय. म्हणून ते जीवाच्या आकांताने सांगताहेत,

’माणसाला मीठ फुटलं तर चालेल,

पण जमिनीला कॅन्सर होता कामा नये,’

आणि पुढं अपेक्षाही व्यक्त करतांना म्हणताहेत की माणसाचं खूप झालं, आता प्राण्यांना आरक्षण हवं, त्यासाठी माणसातल्या मोकाट जनावरांना दिसताक्षणी जेरबंद करण्याचा आग्रह धरतात. नाही तर काय होईल याचं भयचकित चित्र रेखाटतांना माणसाला उद्देशून ते म्हणतात,

’धावत सुटाल बेभान, जिवाच्या आकांताने

माणसांच्या कळपात सापडलेल्या बिबट्यासारखे

आणि...

...आणि...

विषाणूंची अदृश्य फौज जाळी लावून बसली असेल...

तुमच्यासाठी...


एक दिवस...’

आणि खरोखरच आज आपण सगळेच त्या विषाणूच्या जाळ्यात अडकून पडलो आहोत. जानेवारी, २०१९ मध्ये लिहिलेल्या या कवितेत विषाणूचा उल्लेख डॉक्टरांच्या दूरदृष्टीची साक्ष देतो. शिवाय त्यांनी ’माणसांच्या कळपात’ असा शब्दप्रयोग केलाय. वास्तविक ’कळप’ हा शब्द जनावरांच्या समूहासाठी वापरला जातो. येथे तो वापरलाय माणसांच्या हिंसक नि विकृत प्रवृत्तीचे प्रतिक म्हणून! नाहीतर जनावरं जनावरासारखंच वागतात माणसंच फक्त माणसासारखं वागत नाहीत. म्हणजे आणखी असं की, माणसांना जनावरं म्हणणं जनावरांप्रमाणं वागणाऱ्या जनावरांचं अवमूलन केल्यासारखंच होईल. डॉ. अनिल मडके यांच्या या कवितेत कोरोना–महामारीची जशी कारणमीमांसा केलीय त्याचप्रमाणे त्यावर उपायही सांगितलाय म्हणून त्यांचं ’अस्वस्थ वर्तमाना’वरचं भाष्य निश्चितच केवळ समजून घेण्यासारखं नाही तर कृतीत आणण्यासारखं आहे.

अशा या ’ अस्वस्थ वर्तमाना ’ ला वेगवेगळ्या कलावंतानी आपापल्या माध्यमाव्दारे आविष्कृत केलंय. त्यामध्ये त्यांचं आकलनही आहे नि भाष्यही आहे. यातून एक अपेक्षा केली जाऊ शकते की, या सगळ्या कलाकृतींच्याव्दारे वाचक प्रेक्षक रसिकांच्यामध्ये ’विरेचन’ (Catharsis) घडून येते काय? म्हणजे मन निखळ, निरोगी आणि मोकळे होते काय? विरेचनामुळे समाधान मिळते, ज्ञानही मिळते आणि एक चांगली मानसिकताही निर्माण होते. ग्रीक साहित्य आणि कलेतील शोकांतिकतेने असे घडते असे मानले जाते. वास्तविक आपल्याकडील विशेषतः बौध्द साहित्यातील ’थेरी गाथा’ या भव्य शोकांतिका होत. अभ्यासकांचे नि कलावंताचेही लक्ष तिकडे अजून फारसे गेलेले दिसत नाही. ही पण एक शोकांतिकाच म्हणावी लागेल. तर वर चर्चा केलेल्या कलावंतांच्या कलाकृतीद्वारे अशाप्रकारे विरेचन घडून आले तर या कलावंतांनी आपली भूमिका नेमकेपणाने बजावली आहे असे मानावे लागेल.

या सगळ्या कलाकृतींवर एक नजर टाकल्यास एक वेगळेच वैशिष्ट्य जाणवते. सेक्युलॅरिझमचा एक अर्थ आहे, 'या जगासंबंधी ' (Worldly) . ज्या मध्ये पारलौकीतेचा संबंध नाही. या सगळ्या कलाकृती या जगासंबंधीच्या आहेत . या जगातल्या समस्यासंबंधी आहेत . त्यावरील उपायासंबंधी आहेत . एका अर्थाने या सगळ्या कलाकृती सेक्युलर आहेत म्हणून ती एक सेक्युलर आर्ट मुव्हमेंटच आहे

शिवाय यातील शिल्प असो, चित्र असो, फोटोग्राफी असो किंवा कविता असो. त्यामागे केवळ पैसे मिळविणे उद्देश नाही. म्हणजे या कलाकृतींचं प्रदर्शन भरविलं जाईल आणि आपली कलाकृती जास्तीत जास्त किमतीला विकली जाईल अशी अपेक्षा कोणाची नाही. (कदाचित तसे घडूही शकते पण तो काही या कलावंतांचा उद्देश नाही.) ही विचाराशी, समाजाशी एकूण मानव्याशी आणि कलेशीही असणारी बांधिलकी आहे. आणि हीच सार्वत्रिक नैतिकता आहे आणि तेच सौंदर्यही आहे. वास्तविक जीवनमूल्ये हीच नैतिकमूल्ये, तीच सौंदर्यमुल्येही होत. हा उदघोष सगळ्या कलाकृती करताहेत .आणि या 'अस्वस्थ वर्तमान ' तही या कलावंतांनी बजावलेली ही चोख नि रास्त भूमिका केवळ इतर कलावंतांनाच नव्हे तर सर्वांनाच प्रेरक , मार्गदर्शक नि अनुकरणीय ठरणारी आहे.



चित्रकार :प्रभाकर कांबळे




चित्रकार :सुनील अवचार




चित्रकार :सुनील अवचार




चित्रकार :अन्वर हुसेन





चित्रकार :अन्वर हुसेन






चित्रकार :विक्रांत भिसे




चित्रकार :पिसुर्वो




चित्रकार :संजीव सोनपिपरे



चित्रकार :संजीव सोनपिपरे



# निशब्द -03

चित्रकार :सुरेश पंडित



निशब्द-04


चित्रकार :सुरेश पंडित



चित्रकार :नंदकुमार जोगदंड




चित्रकार :नंदकुमार जोगदंड



चित्रकार :राजू बाविस्कर




चित्रकार :गोपाल गंगावणे



चित्रकार :गोपाल गंगावणे




चित्रकार :मयुरी चारी




चित्रकार :मयुरी चारी

चित्रकार :तेजस्वी सोनावणे





2_Title: **Arrive Home |** Medium: Etching on Home | Size: 27.5”  x  19.6”  | Year_ 2014 | Price:

चित्रकार :तेजस्वी सोनावणे



फोटोग्राफर : पद्मश्री सुधारक ओलवे



फोटोग्राफर : पद्मश्री सुधारक ओलवे



फोटोग्राफर : पद्मश्री सुधारक ओलवे



फोटोग्राफर : अपर्णा ओलवे



फोटोग्राफर : अपर्णा ओलवे